सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मालवणी पोलीस ठाणे,
गेट नं. ०५, अब्दुल हमीद रोड, मालाड (प), मुंबई
दूरध्वनी क्र. ०२२-२८८२७५५७/२८८१३१९
Email : ps.malvani.mum@mahapolice.gov.in



मालवणी पोलीस ठाणे कडून Commercial Quantity इतका एकुण ८००.९० ग्रॅम ''हेरॉईन'' (आंतरराष्ट्रीय अं.किं. २,४०,३०,०००/- रु) हस्तगत केले बाबत.

" PRESS NOTE "

दिनांक १४/०८/२०२६ रोजी मालवणी पोलीस ठाणे येथे एका इसम वय ३४ वर्षे याचे ताब्यात ४.९० ग्रॅम ''हेरॉईन'' हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्या प्रकरणी गु.र.क्र. १३६१/२०२६ कलम ८(क) सह कलम २१(अ) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या तपासात ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीताचा साथीदार इसम वय १९ वर्षे याचेकडे एकुण २६३ ग्रॅम ''हेरॉईन'' मिळुन आल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीत क्र. ०२ वय १९ वर्षे याचेकडे त्याने सदरचा ''हेरॉईन'' हा अंमली पदार्थ कोठुन व कोणा कडुन आणला याबाबत सखोल तपास केला असता, सिकरोडा, राज्य उत्तराखंड येथे राहणारे पाहिजे आरोपीत हे मुंबई व त्याचे आजुबाजुच्या जिल्हयांमध्ये हिरोईन या अंमली पदार्थाची विक्री करित असल्याची व त्यांचे दोन साथीदार हे जुहू येथे हिरोईनची विक्री करित असल्याची माहिती मिळुन आली.

सदर माहितीच्या आधारे मुख्य आरोपीताचे दोन साथीदार आरोपीत क्र. ०३ वय २५ वर्षे व आरोपीत क्र ०४ वय २० वर्षे यांना ५३३ ग्रॅम हिरोईन (अं.किं. १,५९,९०,०००/- रू.) या अंमली पदार्थासह जुहू येथुन ताब्यात घेण्यात आले आहे. नमद गुन्हयातील मुख्य आरोपी हे सिकरोडा, राज्य उत्तराखंड येथे असल्याची तपासात माहिती मिळुन आली असुन त्याबाबत अधिक तपास पोउनि लोंढे हे करित आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.) डॉ. श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, श्री. शशिकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर, परिमंडळ ०२, श्री. संदिप घुगे, मा. सपोआ मालवणी विभाग, श्री. महेशकुमार ठाकुर, वपोनि राणी पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मिना मरे, पोउनि प्रदिप लोंढे, पोशिक्र. १४००५३/साजिद शेख, पोशिक्र. १४००८५/मुद्दस्सर देसाई, पोशिक्र. १४१५६८/कालिदास खुडे, पोशिक्र. १०००१४/आदित्य राणे (तांत्रीक मदत) यांनी केली आहे.

****

Scanned with OKEN Scanner